# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे भाग्यनगर जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. ६५/२०२६ कलम. ७ भ्र.प्र.अ. १९८८ |
| 4 | तक्रारदार | महिला, वय २४ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | १) मनोहर अर्जुनराव शिंदे, वय ४५ वर्षे, शिक्षक (गट क), रा.सहयोग नगर, नांदेड<br>२) सचिन सतीश शिवरामवार , वय ३९ वर्षे, शिपाई (मानधन तत्वावर), रा. यशोधरा नगर जय हिंद पार्क, सिडको, नांदेड, दोघे नेमणुक, महात्मा कबीर विद्यालय सहयोग नगर नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ०३.०२.२०२६ रोजी १२.०७ ते १२.२० च्या दरम्याण महात्मा कबीर विद्यालय सहयोग नगर नांदेड येथे |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०३.०२.२०२६ चे २१.०४ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ४००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ४००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दि.०२/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, त्यांचे सन २०१६ मध्ये महात्मा कबीर विद्यालय सहयोग नगर नांदेड येथून दहावीचे शिक्षण पूर्ण झाले आहे. तक्रारदार यांचे दहावीचे सनद मध्ये त्यांची जन्म दिनांक चुकीची पडल्याने त्यांनी शाळेतील शिक्षक शिंदे यांच्याशी संपर्क केला. तेव्हा शिक्षक शिंदे यांनी त्यांच्या दहावीच्या सनद वरील जन्मदिनांक दुरुस्ती करुन देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून सुरुवातीला १०००/— रुपये व त्यानंतर परत २२००/— रुपये फोन पे द्वारे घेतले. त्यानंतर शिक्षक शिंदे यांनी तक्रारदार यांचे व्हाट्सअप वर दिनांक २७/०१/२०२६ रोजी दहावीच्या सनद वरील जन्म दिनांक दुरुस्तीसाठी आणखीन ४००/— रुपये लागतील असा मेसेज पाठवला. तेव्हा तक्रारदार यांनी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी त्यांचे वडिलांना शाळेत पाठविले. त्यावेळी शिक्षक शिंदे यांनी तक्रारदार यांचे वडिलांना सनद वर जन्म दिनांक दुरुस्ती झाली आहे. आणखीन ४००/— रुपये लागतील असे म्हणून लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>दिनांक ०२/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांनी शासकीय पंचासह महात्मा कबीर विद्यालय, सहयोग नगर, नांदेड येथे जाऊन शिक्षक शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी शिक्षक शिंदे यांनी तुमचे सनद वरील जन्म दिनांक दुरुस्ती झाली आहे. तू वर जाऊन मुख्याध्यापक यांच्याकडून सनद घेऊन टाक असे म्हणाले. नंतर तक्रारदार यांनी मुख्याध्यापक यांच्याकडून सनद घेऊन खाली आली. त्यानंतर तक्रारदार यांना शिपाई सचिन शिवरामवार यांनी ४००/— रुपयाची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी कशाचे ४००/— रुपये असे विचारले असता, शिपाई सचिन शिवरामवार यानी शिंदे साहेबांनी सांगितले आहेत असे म्हणाला. तेव्हा तक्रारदार यांनी कुठे आहे शिंदे सर असे विचारले, तेवढयात त्या ठिकाणी शिक्षक शिंदे हे आले व त्यांनी ४००/— रुपये देऊन टाक तुझे सनदचे काम झाले आहे असे म्हणून झालेल्या कामाचा मोबदला म्हणुन ४००/— रुपये लाचेची मागणी केली.त्यावेळी तक्रारदार यांनी सध्या माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणाले असता, शिक्षक शिंदे यांनी फोन पे वर टाक असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी तुमच्या नंबर वर ट्रांजेक्शन फेल दाखवत आहे असे म्हणाले असता शिक्षक शिंदे यांनी सचिनचे (शिपाई सचिन शिवरामवार) फोन पे वर ४००/— रुपये टाकण्यांस सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी सचिनचे पण फोन पे वर पैसे जात नाहीत मी घरुन जाऊन उद्या आणून देते असे म्हणुन सनद घेऊन परत आली.<br>दिनांक. ०३/०२/२०२६ रोजी तक्रारदार यांनी महात्मा कबीर विद्यालय सहयोग नगर येथे जाऊन शिक्षक शिंदे यांची भेट घेतली. तेव्हा शिक्षक शिंदे यांनी तक्रारदार यांना तुमच्या दहावीच्या सनद वर जन्म दिनांक दुरुस्त करुन आणली आहे, असे म्हणून झालेल्या कामाचा मोबदला म्हणून स्वत:साठी व शिपाई सचिन शिवरामवार साठी तक्रारदार यांच्याकडून ४००/— रुपये लाच रक्कम स्वीकारताना रंगेहाथ मिळून आले आहे. म्हणुन पोस्टे भाग्यनगर नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोउपअधि राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक अर्चना करपुडे व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** — ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९

**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** — ०२४६२ – २५५८११

**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** — मो.नं. ९३५९०५६८४०.

| | |
|---|---|
| ४) टोल फ्रि | – १०६४ |
| ५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी कमांक | – ०२४६२ – २५३५१२ |
| ६) **Website** | – **www.acbmaharashtra.gov.in** |
| ७) **Mobile App** | – **www.acbmaharashtra.net** |
| ८) **Facebook Page** | – **www.facebook.com/maharashtraACB** |
| ९) **Twitter** | – **@ACBnanded** |
| १०) **Instagram** | – **acb_nanded** |
| ११) **Youtube Cahnnel** | – @AntiCorruptionBureauNanded |
| १२) **whats App number** | – ८९५५६५०१०६४ |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक ★ ला.प्र.विभाग, नांदेड युनिट ★

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड